# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## निवडणूक - २०१७

सर्व संबंधितांना या प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, त्याअंतर्गत शासनाने केलेले एकरूप परिनियम आणि शासन अधिसूचना दि. १७ मे २०१७ मधील तरतुदीनुसार विद्यापीठातील विविध अधिकारमंडळांच्या निवडणुका लवकरच घेण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने विविध निर्वाचक गणांच्या [(१) प्राचार्यांचा गट (पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक) (२) व्यवस्थापन प्रतिनिधींचा गट (संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन समित्यांचे प्रतिनिधी) (३) विद्यापीठ अध्यापकांचा गट (४) अध्यापकांचा गट (संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक) व (५) संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या विभागप्रमुखांचा गट] तात्पुरत्या स्वरुपाच्या याद्या सर्व संबंधितांच्या अवलोकनार्थ विद्यापीठाच्या www.bamu.ac.in या संकेतस्थळावरील 'Election to various University Authorities-2017' या लिंकवर याद्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

कोणासही त्यावर काही आक्षेप किंवा दुरुस्ती सुचवायची असल्यास दिनांक ०७-०९-२०१७ पर्यंत कुलसचिवांच्या कार्यालयात (निवडणूक विभाग) लेखी स्वरुपात सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात व सबळ पुराव्यासह कार्यालयीन वेळेत खास दूतामार्फत अथवा स्वतः सादर करावेत. (आक्षेप सादर करण्याचा नमुना संकेतस्थळावर उपलब्ध आहे).

संबंधित याद्यांबाबत विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले व सबळ पुराव्याअभावी सादर केलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**<u>टीपः-</u>**

१. 'व्यवस्थापन प्रतिनिधींचा गट' यासाठी एकाच संस्थेने दोन नावे सुचविली असल्यास, तसेच तात्पुरत्या यादीमध्ये त्यांच्या नावासमोर 'VALID' असा शेरा दर्शविला असल्यास, संबंधित संस्थेने आक्षेप सादर करावयाच्या विहित कालावधीत, सादर केलेल्या नावापैकी कोणते नाव ग्राह्य धरावे, याबाबत कुलसचिवांच्या कार्यालयात (निवडणूक विभाग) लेखी स्वरुपात कळवावे.

२. 'व्यवस्थापन प्रतिनिधींचा गट' या अनुषंगाने एका संस्थेअंतर्गत कितीही महाविद्यालये असली तरीही एका संस्थेचा एकच प्रतिनिधी असेल अशी नियमानुसार तरतूद आहे. करिता, एका संस्थेने वेगवेगळ्या महाविद्यालयांच्या नावे एकापेक्षा जास्त अर्ज सादर केले असल्यास, तसेच तात्पुरत्या यादीमध्ये त्यांच्या नावासमोर 'VALID' असा शेरा दर्शविला असल्यास, सादर केलेल्या नावापैकी कोणते नाव ग्राह्य धरावे, याबाबत कुलसचिवांच्या कार्यालयात (निवडणूक विभाग) लेखी स्वरुपात कळवावे.

29-8-17

| | | |
|---|---|---|
| संदर्भ क्र. सा.प्र./निवडणूक/२०१७/ | )( | |
| विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद | )( | कुलसचिव तथा निवडणूक अधिकारी |
| दिनांक २९-०८-२०१७ | )( | |